# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः14.12.2025** **वारःरविवार**

1. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज दिल्लीत 2025 चे राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन पुरस्कार प्रदान करणार
2. पाच वर्षांत बस्तर सर्वात विकसित आदिवासी प्रदेश बनेल: केंद्रीय मंत्री अमित शाह यांचा विश्वास
3. दिल्लीच्या एम्समध्ये पक्षाघातावरील सुपरनोवा स्टेंटची चाचणी
4. पुणे पुस्तक महोत्सवाचा आरंभ
5. आयसिसशी संबंधित साकिब नाचन प्रकरणात ईडीचे 40 ठिकाणी छापे आणि
6. धरमशाला इथं आज भारत-दक्षिण आफ्रिका यांच्यात तिसरा टी-ट्वेंटी क्रिकेट सामना

**राष्ट्रपती एनर्जीडे**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज नवी दिल्लीत 2025 च्या राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन पुरस्कार तसंच ऊर्जा संवर्धन या विषयावरील राष्ट्रीय चित्रकला स्पर्धेच्या विजेत्यांना पारितोषिकं प्रदान करण्यात येणार आहेत. आज राष्ट्रीय ऊर्जा दिनानिमित्त या समारंभाचं आयोजन करण्यात आलं असून राष्ट्रपती या कार्यक्रमाला संबोधितही करतील. ऊर्जा संवर्धनाच्या महत्त्वाबद्दल सजगता निर्माण करण्यासाठी आणि ऊर्जा कार्यक्षमतेत देश करत असलेली प्रगती अधोरेखित करण्यासाठी दरवर्षी 14 डिसेंबरला देशात ऊर्जा दिन साजरा केला जातो.

**बस्तर**

नक्षलवादाचा कोणालाही लाभ होत नाही आणि केवळ शांतताच विकासाचा मार्ग मोकळा करू शकते असं ठाम प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केलं आहे. छत्तीसगडमधील जगदलपूर इथं बस्तर ऑलिम्पिकच्या समारोप समारंभात ते काल बोलत होते. पुढील वर्षी 31 मार्चपर्यंत नक्षलवाद संपवण्याच्या सरकारच्या संकल्पाचा त्यांनी पुनरुच्चार केला. ते म्हणाले की, केंद्र सरकारनं पुढील पाच वर्षांत छत्तीसगडच्या बस्तर विभागाला देशातील सर्वात विकसित आदिवासी प्रदेश बनवण्याचा निर्णय घेतला आहे. नक्षलवादामुळं या प्रदेशाचा विकास थांबला होता, परंतु ही समस्या संपुष्टात आल्यानंतर प्रगतीचं एक नवीन पर्व सुरू होईल. त्यांनी प्रतिबंधित माओवादी संघटनेशी संबंधित असलेल्यांना शस्त्रं खाली ठेवून समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील होण्याचं आवाहन केलं.

दरम्यान, महाराष्ट्रात गोंदिया इथं काल तीन माओवाद्यांनी पोलिसांसमोर आपली शस्त्रं खाली ठेवली आणि ते शरण आले.

**हस्तकला**

हस्तकला उद्योगातून सुमारे 50 हजार कोटी रुपयांची निर्यात होते आणि लवकरच ही निर्यात 1 लाख कोटी रुपयांपर्यंत वाढण्याची अपेक्षा आहे असं केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरीराज सिंह यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत 'क्राफ्टेड फॉर द फ्युचर' या कार्यक्रमाच्या तिसऱ्या आवृत्तीचं उद्घाटन करताना ते काल बोलत होते. आजची तरुण पिढी पारंपरिक हस्तकलेचं महत्त्व जाणते असं सांगून गिरीराज सिंह म्हणाले की जगभरातील चाहत्यांना आवडतील अशी समकालीन उत्पादनं ते सादर करत आहेत. सरकारनं 'हब अँड स्कोप' मॉडेल अंतर्गत 100 कारागिरांसोबत भागीदारी करून हस्तकला उत्पादनं जगभरात निर्यात करण्यास सुरुवात केली आहे असंही ते म्हणाले.

**रेल्वे**

रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल वंदे भारत गाड्यांमध्ये संबंधित प्रदेशातील स्थानिक खाद्यपदार्थ उपलब्ध करून देण्याबाबत अधिकाऱ्यांसोबत चर्चा केली. रेल भवनमध्ये अधिकाऱ्यांशी संवाद साधताना मंत्री म्हणाले की, या उपक्रमामुळं प्रवाशांचा अनुभव सुधारेल आणि प्रवास करत असलेल्या प्रदेशांची संस्कृती आणि चव त्यांना अनुभवता येईल. IRCTC संकेत स्थळावर नवीन यूजर आयडी तयार करणाऱ्या बनावट ओळखपत्रांची संख्या पूर्वीच्या दररोज एक लाखांवरून 5 हजारांपर्यंत खाली आणण्यात आली आहे अशी माहिती वैष्णव यांनी दिली. 3 कोटींहून अधिक बनावट खाती निष्क्रिय करण्यात आली आहेत आणि 2 कोटींहून अधिक यूजर आयडी तात्पुरते निलंबित करण्यात आले आहेत.

**स्टेंट**

नवी दिल्लीच्या अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेनं पक्षाघातावरील 'सुपरनोव्हा स्टेंट' नावाच्या नवीन आणि प्रगत उपचार उपकरणाची भारताची पहिली चिकित्सालयीन चाचणी घेतली आहे. सुपरनोव्हा स्टेंट देशातील विविध प्रकारच्या रुग्णांसाठी तयार केला आहे. पाश्चात्य देशांच्या तुलनेत कमी वयाच्या रुग्णांनाही अनेकदा पक्षाघात होतो. देशांतर्गत चिकित्सालयीन चाचणीच्या आधारावर मान्यता मिळालेलं हे देशातील पहिलं उपकरण असल्याचं एम्सच्या सूत्रांनी सांगितलं. या उपकरणाद्वारे दक्षिण-पूर्व आशियामध्ये 300 हून अधिक रुग्णांवर आधीच उपचार करण्यात आले आहेत. सुपरनोव्हा स्टेंटचं उत्पादन आता देशातच केलं जाईल, आणि दरवर्षी स्ट्रोकनं पीडित 17 लाखांहून अधिक नागरिकांना आशेचा किरण मिळेल असा विश्वासही एम्सनं व्यक्त केला आहे.

**पर्यटन**

आसियान-भारत पर्यटन व्यवसायिक विनिमय कार्यक्रम 2025 गुवाहाटी इथं भारत आणि आसियान सदस्य राष्ट्रांमधील दहा देशांच्या पर्यटन व्यावसायिकांमधील दोन दिवसांच्या सखोल संवादानं काल सुरू झाला. परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाच्या सहयोगानं आसाम पर्यटन विकास महामंडळ लिमिटेडद्वारे आयोजित हा कार्यक्रम 17 डिसेंबरपर्यंत गुवाहाटी, काझीरंगा आणि नवी दिल्ली इथं आयोजित केला जात आहे. क्वालालंपूर इथं आयोजित मॅटा फेअर 2025 मधील भारताच्या सहभागावर आधारित हा कार्यक्रम आहे. या कार्यक्रमात आसाम पर्यटन विकास महामंडळानं आसियान-भारत पर्यटन वर्षांतर्गत आसाम आणि ईशान्य भारतातील उदयोन्मुख पर्यटन स्थळं सादर केली होती. आसियानचे एकोणचाळीस प्रतिनिधी या कार्यक्रमात सहभागी होत आहेत.

**बुकफेस्ट**

राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या वतीनं आयोजित पुस्तक महोत्सवाचं उद्घाटन काल पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर करण्यात आलं. यावेळी केंद्रिय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे मंत्री चंद्रकांत पाटील, पुणे विद्यापीठाचे कुलगुरू सुरेश गोसावी, राष्ट्रीय पुस्तक न्यासाचे मिलिंद मराठे, संयोजक राजेश पांडे, यशस्वी समूहाचे अध्यक्ष विश्वेश कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते. हा महोत्सव येत्या 21 तारखेपर्यंत सुरु राहणार आहे. या महोत्सवात पुस्तक प्रकाशकांनी साडेसातशे दालनं स्थापन केली आहेत. पुणे पुस्तक महोत्सवाला मिळणारा वाढता प्रतिसाद पाहता येत्या काळात पुणे ही पुस्तकाची राजधानी करण्यासाठी प्रयत्न करणार असून पुढील वर्षी हा महोत्सव जागतिक पुस्तक महोत्सव म्हणून आयोजित करण्याचा मानस असल्याचं राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी याप्रसंगी बोलताना सांगितलं.

**इसिस-छापे**

इसिस या दहशतवादी संघटनेशी संबंधित तसंच या कारवायांसाठी आर्थिक मदत केल्याशी संबंधित प्रकरणाच्या तपासाअंतर्गत सक्तवसुली संचालनालयानं साकिब नाचन प्रकरणात काल देशभरात 40 ठिकाणी छापे टाकले. ED ने मुंबईजवळील पडघा-बोरीवली परिसर तसंच रत्नागिरीसह इतर ठिकाणांचा यात समावेश होता. या मोहिमेदरम्यान रोख रक्कम, सोन्याचे दागिने आणि सोनं अशा स्वरूपातील 9 कोटी 70 लाख रुपयांपेक्षा जास्त मूल्याची मालमत्ता जप्त करण्यात आली.

**<u>प्राप्तीकर</u>**

केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळानं 'नज' (NUDGE) मोहिमेअंतर्गत करदात्यांना त्यांचं आयकर विवरणपत्र अद्ययावत करण्याचं आणि कोणतेही चुकीचे दावे मागे घेण्याचं आवाहन केलं आहे. या मोहिमेअंतर्गत, या महिन्याच्या 12 तारखेपासून अशा करदात्यांना त्यांच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर आणि ईमेलवर एसएमएस आणि ईमेलद्वारे सूचना पाठवल्या जात आहेत. करदात्यांनी विभागाकडं दाखल केलेल्या कागदपत्रांमध्ये योग्य मोबाईल क्रमांक आणि ईमेल आयडी नमूद केले आहेत याची खात्री करावी, जेणेकरून त्यांच्याकडून कोणतीही सूचना सुटणार नाही असाही सल्ला CBDT नं करदात्यांना दिला आहे.

**<u>मेस्सी</u>**

कोलकाता इथं लोकप्रिय फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी याच्या कार्यक्रमावेळी मैदानावर गोंधळ झाल्यामुळं या कार्यक्रमाच्या आयोजकाला पोलिसांनी अटक केली आहे. पोलिस महानिरीक्षक जावेद शमीम यांनी सांगितलं की, प्राथमिक तपास सुरू असून, पोलीस मैदानामधील गोंधळाच्या घटनेशी संबंधित सर्व तथ्यं गोळा करत आहेत. कार्यक्रमासाठी घेतलेल्या तिकिटांचे पैसे परत केले जावेत यासाठी सूचना देण्यात आल्या आहेत. फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी काल सकाळी कोलकात्याच्या युवा भारती क्रीडांगणात दाखल झाला तेव्हा त्याच्याभोवती गोळा झालेल्या गर्दीमुळं लोकांना त्याचं दर्शन झालं नाही. शिवाय तो नंतर लगेचच मैदानातून बाहेर पडला. यामुळे निराश झालेल्या त्याच्या चाहत्यांनी प्रचंड गोंधळ केला. त्यात मैदानाचं नुकसान झालं.

**<u>क्रिकेट</u>**

भारत आणि दक्षिण आफ्रिका क्रिकेट संघादरम्यानचा तिसरा टी-ट्वेंटी क्रिकेट सामना आज धरमशाला इथं होणार आहे. संध्याकाळी 7 वाजल्यापासून सामना सुरू होईल. पाच सामन्यांच्या या मालिकेत दोन्ही संघांनी प्रत्येकी एक सामना जिंकला आहे.

19 वर्षांखालील क्रिकेट संघाच्या आशिया चषक स्पर्धेच्या गटस्तरीय फेरीतला दुसरा सामना आज भारत आणि पाकिस्तान या पारंपरिक प्रतिस्पर्ध्यांदरम्यान दुबई इथं खेळला जाणार आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार सकाळी साडेदहा वाजता हा सामना सुरू होईल.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.